# पज्ज–विभागो

१

पढमो पाढो

## सुवयणाइं

सुवचने, सुभाषिते किंवा सूक्ती हे भारतीय संस्कृतीतील जन्मलेल्या सर्व भाषांची खास देणगी आहे. अर्धमागधी भाषेतील ग्रंथांमध्ये, अशी सुवचने विपुल प्रमाणात आढळतात. वस्तुत: हे ग्रंथ धार्मिक आणि उपदेशात्मक आहेत. तरीही आपले वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवन जगण्यास त्यातील शाश्वत नीतिमूल्ये दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरतात.

या पाठातील काही अर्धमागधी सुवचने (गाथा) सूत्रकृतांग, उत्तराध्ययन, दशवैकालिक-अशा मूलग्रंथांतून घेतली आहेत. इतर काही सुवचने मूलग्रंथांवर आधारित अशा टीका (भाष्य) वजा ग्रंथातून घेतलेली आहेत. यातील सुवचनातून उद्योजकतेची प्रेरणा मिळते. आदर्श शिक्षकाचे जीवनध्येय दीपकाच्या दृष्टांतातून स्पष्ट होते. आहार आणि आरोग्याच्या जाणिवा जागृत होतात. येथे दिलेल्या गाथांपैकी दोन गाथांमधून व्यसनमुक्तीचा संदेश दिला आहे. विनम्रतेचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी दिलेल्या मेघ, वृक्ष आणि पिकांच्या दृष्टांतातून नीतिबोध प्राप्त होतो.

---

**आत्मप्रशंसा – परनिंदा :**

सयं सयं पसंसंता, गरहंता परं वयं ।
जे उ तत्थ विउस्संति, संसारं ते विउस्सिया ।।१।।

**कूर्मदृष्टांत :**

जहा कुम्मे सअंगाइं, सए देहे समाहरे ।
एवं पावाइं मेहावी, संजमेण समाहरे ।।२।।

**जागृती :**

जागरह नरा ! णिच्चं, जागरमाणस्स वड्ढते बुद्धी ।
सो सुवति ण सो धन्नो, जो जग्गति सो सया धन्नो ।।३।।

**आदर्श शिक्षक :**

जह दीवा दीवसयं, पइप्पए सो य दिप्पए दीवो ।
दीवसमा आयरिया, दिप्पंति परं च दीवेंति ।।४।।

**आरोग्य :**

हियाहारा मियाहारा, अप्पाहारा य जे नरा ।
न ते विज्जा तिगिच्छंति, अप्पाणं ते तिगिच्छगा ।।५।।

**दुर्लक्ष :**

अणथोवं वणथोवं, अग्गीथोवं कसायथोवं च।
ण हु भे वीससियव्वं, थोवं पि हु ते बहुँ होइ ।।६।।

**मद्याचे दुष्परिणाम :**

मज्जेण णरो अवसो, कुणेइ कम्माणि णिंदणिज्जाइं ।
इहलोए परलोए, अणुहवइ अणंतयं दुक्खं ।।७।।

**विनय :**

साली भरेण, तोएण जलहरा, फलभरेण तरुसिहरा ।
विणएण य सप्पुरिसा, नमंति न हु कस्स वि भएण ।।८।।

**आहार :**

अत्थंगयम्मि आइच्चे, पुरत्था य अणुग्गए ।
आहारमाइयं सव्वं, मणसा वि न पत्थए ।।९।।

**व्यसनमुक्ती :**

इत्थी जूयं मज्जं मिगया वयणे तहा फरुसया य ।
दंडफरुसत्तमत्थस्स दूसणं सत्त वसणाइं ।।१०।।

---

## शब्दार्थ व टीपा

**गाथा (१) भावार्थ -**

आपापल्या मतांची (वचनांची) प्रशंसा करणारे आणि दुसऱ्यांच्या मतांची निंदा करणारे जे लोक आपले पांडित्य प्रगट करतात, ते संसारात परिभ्रमण करतात.

**पसंसंता, गरहंता** - 'पसंस' आणि 'गरह' या क्रियापदांची व. का. धा. वि. पुंलिंगी बहुवचने.

**विउस्संति** - गर्वाने फुगतात.

**संसारं ते विउस्सिया** - ते संसारात परिभ्रमण करतात.

**गाथा (२) भावार्थ -**

(संकटाची चाहूल लागताच) जसे कासव आपले सर्व अवयव संकुचित करून शरीराजवळ घेतो त्याप्रमाणे बुद्धिमान माणसाने संयमपूर्वक वर्तनाने पापांपासून आपला बचाव करावा.

**कुम्मे** - कूर्म, कासव.

**समाहरे** - संकुचित करतो.

**सए देहे** - स्वत:च्या देहात.

**मेहावी** (वि.) - मेधावी, बुद्धिमान.

**संजमेण** - 'संजम' मूळ नाम, तृतीया एकवचन, संयमाने.

**गाथा (३) भावार्थ -**

हे मानवांनो, नित्य जागृत व्हा. जागरूक असलेल्या मनुष्याची बुद्धी वाढते. जो आळशीपणाने झोपून राहतो तो धन्य नव्हे. सदैव सावध राहून पुरुषार्थ करणाराच धन्य होय.

**जागरह** (क्रि.) - 'जागर', आज्ञार्थ, द्वितीय पुरुष बहुवचन.

**सुवति-जग्गति** - 'सुव' आणि 'जग्ग' क्रियापदांचे वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन, झोपतो आणि जागतो.

**गाथा(४) भावार्थ -**

आचार्य (आदर्श शिक्षक) हे प्रदीपाप्रमाणे आहेत. प्रदीप जसा स्वत:ही प्रज्ज्वलित राहतो आणि इतर शेकडो दिव्यांना प्रज्ज्वलित करतो, तसे आचार्य स्वत:ही ज्ञानी असतात आणि अनेक शिष्यांना ज्ञान देतात.

**दिप्पंति** - प्रज्ज्वलित होतात.

**दीवेंति** - प्रज्ज्वलित करतात.

**गाथा (५) भावार्थ-**

जी माणसे हित, मित आणि अल्प आहार घेतात आणि ज्यांना वैद्यांकडून चिकित्सा करून घेण्याची वेळ येत नाही (अर्थात् जे आरोग्यसंपन्न असतात) ते जणू काही स्वत:चेच चिकित्सक (कल्याण करून घेणारे) होतात.

**विज्जा** - वैद्य.

**तिगिच्छंति** (क्रि.) - 'तिगिच्छ', वर्तमानकाळ, तृतीय पुरुष बहुवचन, चिकित्सा करतात.

**अप्पाणं** - स्वत:चे.

**गाथा (६) भावार्थ -**

ऋण (कर्ज), व्रण (जखम), अग्नी आणि कषाय (क्रोधादि विकार) हे या क्षणी थोडेच आहे म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. कारण 'थोड्याचे' 'पुष्कळ' कधी होते, ते कळतही नाही.

**थोवं** (अ.) - स्तोकं, थोडे.

**वण** - व्रण, जखम.

**अण** - ऋण, कर्ज.

**भे वीससियव्वं** - तुमच्याकडून विश्वास ठेवला जाऊ नये.

**गाथा (७) भावार्थ-**

मद्यपानाने माणसाचा स्वत:वरचा ताबा सुटतो. तो निंद्य कर्मे करतो. परिणामी त्याला इहलोकात आणि परलोकात अनंत दु:खे भोगावी लागतात.

**मज्जेण** - 'मज्ज' मूळ नाम, तृतीया एकवचन, मद्याने.

**अवसो** - विवश, बेताल.

**कुणेइ** (क्रि.) - 'कुण' (कर), वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन, करतो.

**इहलोए-परलोए** - 'इहलोय'-'परलोय' नामांची सप्तमी एकवचने, इहलोकात, परलोकात.

**गाथा (८) भावार्थ-**

धान्यांच्या साळींनी भरलेली कणसे, पाण्याने भरलेले मेघ, फळांच्या बहराने झाडांचे शेंडे आणि विनयाने सत्पुरुष आपोआपच नम्र होतात. कोणाच्या भीतीने नव्हे. (समृद्धी प्राप्त झाल्यावर, नम्र होण्याचा या सर्वांचा स्वभावच आहे.)

**गाथा (९) भावार्थ -**

सूर्य अस्ताला गेल्यावर तो पुन्हा जोपर्यंत उगवत नाही तोपर्यंत आहारपान इत्यादि सर्वांची मनाने सुद्धा इच्छा करू नये. (सूर्यास्तानंतरच्या भोजनाचा निषेध केला आहे.)

**अत्थंगयम्मि, आइच्चे, अणुग्गए** - ही सर्व सप्तमी एकवचनाची रूपे आहेत. ही 'सति सप्तमी'ची रचना असून, अर्थ असा की, 'आदित्य अस्ताला गेल्यावर आणि पुन्हा उगवण्यापूर्वी'.

**आहारमाइयं** (संधि) - आहारं+आइयं । आहार इत्यादि.

**मणसा** - 'मण' मूळ नाम, तृतीया एकवचन, मनाने.

**न पत्थ** - प्रार्थना अर्थात् इच्छा करू नये.

**गाथा (१०) भावार्थ -**

परस्त्रीगमन, द्यूत मद्यपान, मृगया (शिकार), कठोर वचने, कठोर शिक्षा देणे आणि अर्थनाश (चोरी) ही सात व्यसने आहेत. अर्थात् या सातही व्यसनांपासून कटाक्षाने दूर राहण्याचा संदेश येथे दिला आहे.

**वयणे फरुसया** - वचनातील, कठोरता.

**अत्थस्स दूसणं** - अर्थाचे दूषण, अर्थनाश, चोरी.

**दंडफरुसत्तमत्थस्स** (संधि) - दंड+फरुसत्तं+अत्थस्स । कठोर शिक्षा देणे.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) संजमस्स कए कस्स दिट्ठंतो दिण्णो ?

(२) आयरिया केहिं सरिसा होंति ?

(३) मज्जस्स के दुप्परिणामा हवंति ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) नित्य जागृत राहिल्याने कोणता लाभ होतो ?

(२) कोणत्या प्रकारचा आहार घेतल्याने वैद्यांकडून चिकित्सा करून घेण्याची वेळ येत नाही ?

(३) कोणकोणत्या गोष्टी थोड्या आहेत म्हणून दुर्लक्ष करू नये ?

(४) गाथेत नोंदविलेल्या सात व्यसनांची नावे द्या.

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) रूपे ओळखा.**

पसंसंता, सअंगाइं, दीवेंति, वीससियव्वं, अणुहवइ

**ब) पुढील प्राकृत शब्दांना पाठातील समानार्थी प्राकृत शब्द द्या.**

कच्छव, बुद्धिमंत, जलण, नीर, सुपुरिस

**क) पुढील शब्दांना तद्भव प्राकृत शब्द लिहा.**

संयम, धन्य, आचार्य, अल्पाहार, चिकित्सक, मद्य, दु:ख, शिखर, जलधर, अस्तंगत, मृगया, सप्त

**विशेष अभ्यास**

या पाठातील वर्तमानकाळी क्रियापदांचा संग्रह करा आणि त्यांचे अर्थ लिहा.

❑ ❑ ❑